# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक 18/06/2019

## सभा सुचना क्रं. 03

| अनु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात चंदनसार, विरार पूर्व येथील 4 मजली इमारतीमध्ये ट्रॉमा केअर संेटर चालविणेकरीता मागविण्यात आलेल्या अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) मधील मंजूर (EOI) धारकाबरोबर संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | **ठराव:-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेचे ट्रॉमा केअर सेंटर चालविण्याकरीता मागविण्यात आलेल्या अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) चे दर वाजवी नसून सदर दराबाबत मे. लायन्स क्लब ऑफ मुंबई वेस्टर्न लिंक्स यांचेसोबत वाटाघाटी करुन सदरचा विषय नव्याने फेर सादर करण्यांत यावा. तूर्तास सदरचा विषय तहकूब करण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागा अंतर्गत विजय नगर तुळींज येथील कार्यरत डायलेसीस विभाग बाहय यंत्रणेद्वारे (Out Sourcing) उपलब्ध करणेकामी मागविण्यात आलेल्या अभिव्यक्ती | **ठराव:-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज येथील डायलेसिस विभाग अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) अंतर्गत मे.लाईफकेअर चॅरिटेबल हॉस्पिटल यांचे प्रति रुग्णांकडून प्रति डायलेसिस दर रु.500/- इतके दर आकारणेस दि.30/05/2019 रोजीच्या निविदा समितीने शिफारस केलेली आहे. याअन्वये मे.लाईफकेअर चॅरिटेबल हॉस्पिटल यांना महाराष्ट्र महापालिका अधिनियम 73(क) अन्वये संविदा करण्यांस ही सभा प्रशासकीय व वित्तीय |

| | | |
|---|---|---|
| | **स्वारस्य (EOI) च्या मंजूरीबाबत.** | मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अफीफ शेख  सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 3. | **प्रभाग समिती एच वॉर्ड क्र.99 मध्ये प्लॅटफॉर्म नं.1 ते एस.टी. डेपोपर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे या कामी केलेल्या निविदा मंजूरी ठरावात दुरुस्ती करणेस मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावात सविस्तर चर्चा होऊन प्रभाग समिती एच वॉर्ड क्र.99 मध्ये प्लॅटफॉर्म नं.1 ते एस.टी. डेपोपर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे या कामी स्थायी समिती दि. 20/04/2018 ठराव क्र. 128 मध्ये पारीत झालेल्या ठेकेदार मे. ओमकार कन्सट्रक्शन यांच्या 3.25% जादा दराने च्या ऐवजी 2.75% जादा दराने अशी चुक दुरूस्त करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे  सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

**नगरसचिव**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**